(73)

जन-२१८-५०० ②

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

## परिपत्रक

क्र. एमओएम/४४८८ दिनांक ०८.१०.२००४.

विषय - महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२

संदर्भ - परिपत्रक क्र.एमओएम/२४४२ दि.२२.०१.२००४

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ ची बृहन्मुंबई महानगरपालिकेत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भित परिपत्रकान्वये सर्व सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना जनतेकडून येणाऱ्या अर्जावर तांतडीने कार्यवाही करुन अर्जदारास योग्य व अनुज्ञेय माहिती अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत देऊन कार्यवाहीनंतरचा मासिक अहवाल विवरणपत्र-अ मध्ये संबंधित उप आयुक्तांमार्फत प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत उप आयुक्त (सा.प्र.) - सक्षम प्राधिकारी यांना सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अपिलावर त्वरीत कार्यवाही करुन कार्यवाहीनंतरचा मासिक अहवाल विवरणपत्र-ब मध्ये म.न.पा. आयुक्तांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करुन त्यांची एक प्रत उप आयुक्त (सा.प्र.) यांना पाठवावयाच्या सूचना दिल्या होत्या.

तथापि सदर अहवाल संकलित करुन जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावयाचे असल्याने सर्व सार्वजनिक माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकाऱ्यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करुन कार्यवाहीनंतरचे मासिक अहवाल अनुक्रमे 'विवरणपत्र-अ' आणि 'विवरणपत्र-ब' मध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी उप आयुक्त (सा.प्र.) यांना सादर करावेत. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर बाब महानगरपालिका आयुक्तांना अवगत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

जन . ४९८



**विवरणपत्र 'अ'**

कार्यालयाचे नांव :-

माहितीचा कालावधी :-

| सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | मागील कालावधीमधील प्रलंबित अर्जांची संख्या | माहिती कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | एकूण अर्जांची संख्या (२+३) | निकालात काढलेल्या अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांची संख्या (४-५) | प्रलंबित राहण्याची संक्षिप्त कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |

**विवरणपत्र 'ब**

कार्यालयाचे नांव :-

माहितीचा कालावधी :-

| अपिलीय प्राधिकाऱ्याचे नांव व पदनाम | मागील कालावधीमधील प्रलंबित अर्जांची संख्या | माहिती कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | एकूण अर्जांची संख्या (२+३) | निकालात काढलेल्या अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांची संख्या (४-५) | प्रलंबित राहण्याची संक्षिप्त कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |

सर्व खाते प्रमुख / सहायक आयुक्त (सार्वजनिक अधिकारी व अपिलीय प्राधिकारी) यांनी उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सही /-२४.९.०४ — उप आयुक्त (सा.प्र.)

सही /-४.१०.०४ — अति. आयुक्त (शहर)

क्र.एमओएम/४४८८ दि.०८.१०.२००४

महानगरपालिका आयुक्तांच्या क्रमांक एमजीआर/४८७३ दिनांक ५.१०.२००४ ~~त्या मान्यतेने~~ नुसार मान्य केलेल्या परिपत्रकाची प्रत ———

( जादा प्रतींसह) यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

(सही)
रचना व कार्यपध्दती अधिकारी
(म.न.पा.आयुक्तांचे कार्यालय)

— ० —